ग्रं. सं. ठाणे.
काव्य
२५६४

# विस्फोट

REFBK-0025495
REFBK-0025495

मधुकर सोनावणे

# विस्फोट

२५६४
२५४९५
१२।१।८८

REFBK-0025495
REFBK-0025495

● मधुकर लक्ष्मण सोनावणे

२५६४
२५४९५

जय प्रकाशन, मुंबई ४०००८२

○ जय प्रकाशन–१

VISPHOT '
MADHUKAR SONAWANE

○ विस्फोट

○ खेप : पहिल्यांदा

○ धम्मचक्र प्रवर्तक दिन १७ ऑक्टोबर १९८७

○ प्रकाशक / सर्वाधिकार
आयु. माधुरी सोनावणे
५/१७ आंबेडकर चौक
मुलुंड कॉलनी, मुंबई ४०००८२

○ मुखपृष्ठ : अरुण कालवणकर

○ आतील चित्रे : चंद्रकांत शिर्के

○ मुद्रक :
आर. के. घरत
अंजली प्रिन्टर्स
अलिबाग–रायगड ४०२२०१

○ मूल्य १२ रुपये

माझ्यासाठी सर्वकाही केले
आणि मला रेघारूपाला आणले
ती माझी दिवंगत मावळण जनाबाई
उर्फ मुक्ताबाई विष्णू थोरात आणि
आजी रेवूबाई यांच्या पवित्र स्मृतीस
आदराने अर्पण.

– मधुकर सोनावणे

# दोन शब्द

'विस्फोट' हा माझा पहिलाच काव्य संग्रह.

डॉ. आंबेडकर, क्रांतीबा फुले नि तथागत यांच्या मानवतावादी वैचारिक दिशेने जाताना येथल्या चांडाळ रुढी, परंपरा नि व्यवस्थेला सुरूंग लावण्यासाठी माझी कविता स्फोटक होते. सर्वहारा दलित, पिडित, उपेक्षित यांना खऱ्या अर्थाने जागृत करण्यासाठी माझी कविता पेटून उठते. दुःख, दैन्य, दास्य यांना नेस्तनाबूत करून मानव मुक्तिच्या लढ्यात माझी कविता तळपती तलवार होते असे मी मानतो. आणि म्हणून ही कविता तुमच्या हाती देताना मला आनंद होत आहे.

या प्रांतात ढकलण्याचे सगळे श्रेय माझा लंगोटीयार कवीवर्य नामदेव ढसाळांचे. त्याचेच सहवासात असल्यामुळे पँथरचा कार्यकर्ता झालो. नामांतर, राखीव जागा, सवलती राष्ट्रीय एकात्मता अशा विविध प्रश्नांवरच्या मोर्चा आंदोलनात मी सहभाग घेतला. त्यातूनच मला काव्यशब्द स्फुरले. माझ्या कविता तुम्हांला त्या वातावरणात घेवून जातील. तुम्हाला त्यांची अनुभूती देतील. नारायण सुर्वे म्हणतात त्याप्रमाणे मी पुस्तकांबरोबर सभोवतालची माणसं वाचली, त्यांच्या काही कविता झाल्या. त्या तुमच्या काळजाला भिडतील असे मला वाटते.

आयु. प्रा. केशव मेश्राम सर यांनी या कविता संग्रहास आस्थेवायीकपणे प्रस्तावना लिहून दिली त्याबद्दल मी त्यांचे आभार कोणत्या शब्दात मानू ? त्यांचा मी ऋणी आहे. आयु. राजा ढाले यांनी या कविता संग्रहासाठी

चार शब्द देवून मार्गदर्शन केले. त्याबद्दल त्यांचा मी अत्यंत आभारी आहे.

माझ्या कवितेला पूर्वप्रसिद्धी दिलेल्या सर्व संपादकांचे मन:पूर्वक आभार मानतो.

अल्पावधीत मनासारख्या सुबक मुद्रणाबाबत आयु. आर. के. घरत व त्यांच्या प्रेसचे कर्मचारी यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहे.

खरं तर मला जें वाटलं, मनाला भावलं ते लिहिलं. नि ते मी तुमच्या पुढं ठेवित आहे. तुम्ही जाणकार ते नीट समजून घ्याल अशी मी का आशा बाळगू नये ?

मधुकर सोनावणे

## पूर्वप्रसिद्धी–१९७७–८७

जयभीम, युगांतर, व्यासपीठ, गृहशोभा, रामभूमी, पूर्वा, अप्सरा, सोविएत मित्र, युगप्रबोधन, आम्रपाली, परी, दलितनारा, श्रमिक विचार, उगम (प्रा. क. सं.) आम्रपाली (प्रा. क. सं.) महाराष्ट्र लोकमित्र, रोमिओ इत्यादी नियतकालिकांतून.

## * आभार *

| | | |
|---|---|---|
| मा.वसंतराव डावखरे | नामदेव ढसाळ, | मोतीराम पाटील |
| मधुकर जी. जाधव | कीर्ति दवे | प्रा. दामोदर मोरे |
| प्रभाकर एच. जाधव | जयप्रकाश खरात | मल्लीका अमरशेख |
| लक्ष्मण डी. खरात | डॉ. प्रेमनाथ डी. कापसे | सुमनभाई रोशीया |
| कमल एस. भाटिया | प्रकाश गीध | एम. आर. पाटील |
| एस. ए. ध्याणिस | सी. बी. कांबळे | अभिमन्यु सुर्यवंशी |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
प्र. क्र. २५४९५
१२।१।६६
ग्रं० शाखा

' आता तर विस्फोट झाला आहे,
आला आहे--

--प्रा. केशव मेश्राम

## प्रस्तावना

मराठी कविता हाच एक फिनिक्स पक्षी आहे. एकाच वेळी अमक्यानंतर कविता संपली अशी आरोळी उठते, तर त्याच वेळी ह्यांनी युगप्रवर्तन केले असा फलक झळकताना दिसतो. कविता ही सायंकाळच्या आभाळ-रंगात दिसणारा अमूर्त तरल रंग कुणी म्हणतात. तर माणसांच्या सुखदुःखांची सहप्रवासिनी म्हणूनही तिचा उद्घोष करतात. आत्यंतिक व्यक्तिवादी, सौंदर्यस्पर्शी व भावानुकूल कवितांना येथे स्थान आहे. बहिर्मुख बाज असलेली, आवाहन व आव्हान देणारी, प्रचारी वाटणारी व समूहवेदना सामावून घेणारी धाराही मराठी कवितेत आहे. त्यामुळे टीकेच्या व उपेक्षेच्या वीजवादळातही कवितेचे बीजांकूर कानाकोपऱ्यात धुमारताना आढळतात.

श्री. मधुकर सोनावणे ह्या नव्या कोऱ्या कवीचा 'विस्फोट' हा पहिलाच कवितासंग्रह. त्यांच्या कवितांच्या पानापानात फिरण्याआधी, त्यांच्या मनात डोकावायला हवे आहे. त्यांच्या ओळीओळीतून फेरफटका करण्याआधी मजूर–श्रमिक–दलितांच्या, खुराडेवजा चाळीत पेटलेल्या, व्यसनवेदनांच्या दाहक होळयांच्या ज्वाळा, समजून घेतल्या पाहिजेत. आपल्या लोकशाही राज्यव्यवस्थेच्या नकारात्मक बाजूचीही झाडाझडती घेतली पाहिजे. आकर्षक घोषणाबाजीने ग्रासलेल्या दलित अस्पृश्यांच्या, 'जैसे थे' अवस्थेचेही वास्तवभान ठेवले पाहिजे, असे मला आग्रहाने सांगावेसे वाटते.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर अन्य नागरिकांप्रमाणे दलितांच्याही अपेक्षा वाढल्या. अमानुष जातीव्यवस्थेवर,

मानसिक व सर्वांगीण शोषणांवर काही रामबाण इलाज ही लोकशाही करेल, असे वाटत होते. पण तसे काही झाले नाही. राज्यकर्ते बदलले. ओळखीचे स्वदेशी चोर दीन दुबळयांच्या जीवावर उठले. शिरजोर मुजोर झाले.

लोकशाही व्यवस्थेला सात वर्षे लोटून गेली होती. कागदोपत्री आश्वासनांचे डोंगर उभे केले होते. पण त्याची अंमलबजावणी नव्हती. मूलभूत हक्कांची हमी होती. पण मूलभूत गरजांसाठी तळमळणाऱ्या कोटयावधी जनतेसोबत समाजाने नाकारलेल्या, व्यवस्थेने ठोकरलेल्या, धर्माने पीडलेल्या, अज्ञानात बुडालेल्या, दलितवर्गाकडे सर्वांगीण दुर्लक्ष होते. पाणी, पूजा, सन्मान, समानता, शिक्षण व संधी नाकारण्याचे षड्यंत्र होते. डॉ. आंबेडकरांच्या रुपाने प्रतिकाराचा व आत्मशोधाचा प्रेषित गर्जना करून उठला. धर्मचक्र प्रवर्तन झाले. जुनी कोळिष्टके झटकली गेली. नवचैतन्य आले. सहप्रवासी देशवासियांचे तोंड मात्र वाकडे झाले. स्वत:च्या पायावर उभे राहू पाहणाऱ्या दलितांशी सवर्णीयांनी सूक्ष्म रीतीने वाकडेपणाने वागण्याचे धोरण स्वीकारले.

धर्मांतर झाले, पण पुढची दिशा ठरण्या–ठरवण्याच्या आधीच डॉ. बाबासाहेबांचे महापरिनिर्वाण झाले. प्रत्यक्षात व मानसिक मोठा आघात दलित समाजावर झाला. अन्य नेत्यांना बाबांचे स्वप्न पेलले नाही. काहीना ते कळलेही नाही. विघटनाच्या चिंचोळया वाटा सुरु झाल्या. सामान्यांच्या दु:खभोगात चक्रवाढ झाली.

श्री. मधुकर सोनावणे यांची कविता, अशाच चिंचोळया घसरंडीच्या वाटांनी वाटचाल करणाऱ्या, भांबावलेल्या पिढीच्या सर्व पडझडीचे सादपडसाद घेऊन

आली आहे. एक सर्वसामान्य गैरसमज मात्र डोक्यातून काढून टाकला पाहिजे. तो म्हणजे सामाजिक परिवर्तनांचे आलेखन करणारा कवी भडक असतो, प्रचारी असतो. कलात्मकतेच्या बाबतीत तो कमअस्सल असतो. बाकीच्या भावभावनांची अंगोपांगे त्याला हलवत बोलवत नाही. याचा व्यत्यास अर्थात असा की जो आत्मलेखन करणारा सौंदर्यवादी कवी असतो तो प्रचारी नसतो. सच्चा कलावंत व शब्दप्रभू असतो. अनेकानेक रूपेविरुपे तो समर्थपणे शब्द-बद्ध करू शकतो. या दोन्ही गृहितकात थोडे सत्य आणि खूप असत्य आहे हे वारंवार सांगण्याची गरज वाटू नये, पण समज आढळतो एवढे मात्र खरे.

श्री. मधुकर सोनावणे श्री. नामदेव ढसाळांच्या दलित पँथर या संघटनेचे अध्यक्ष (मु. प्र.) आहेत. सामाजिक चळवळीच्या आणि परिवर्तनाच्या छोटचामोठ्या लढचात सहभागी आहेत. काही विजय आणि शेंकडो पराजय त्यांनी सगळचांसोबत पचवले आहेत, स्वीकारले आहेत. त्यांची 'आत्मवंचक' ही कविता यादृष्टीने फार बोलकी आहे. सोशल ॲक्टिव्हिटीजच्या नांवाखाली सामाजिक गरजांना बगल देऊन 'रजिस्टर' होणारी मंडळे स्थापन करणारे गद्दार दोस्त सुख चैनीचे नवे हिशेब सापडलेले हे समाजवंचक पाहताना साहताना कवी उद्विग्न होतो. त्यांची ही 'बिमारी' कवीला आतून खदबदून सोडते. पण या श्रेय लाटणाऱ्या सुखशोधक चतुरांना तो थंडपणे म्हणतो.

'नाहीपेक्षा भुंकणाऱ्यांकरिता
म्युनिसिपालिटीच्या गाडीला कॉल करणं
भाग पडेल.
..... याची नोंद घ्या . . .
याची नोद घ्या.'

वस्तुतः या ठिकाणी चढचातिढचा सुरात कवी लिहून गेला असता तरी ते स्वाभाविक वाटले असते. पण तो तसे लिहायला स्वतःला अटकाव करतो, नाव विस्फोट असले तरी.

आपल्या शब्दफुलांच्या अस्तित्वाचे कवीचे समर्थनही संयत व आटोपशीर आहे. 'ज्यांच्या घरात कधीच सूर्य उगवला नव्हता त्यांच्यासाठी, तथागत भगवान बुद्धाच्या दुःख शोधाच्या प्रेरणेसाठी व प्रज्ञाशील करुणेच्या अनात्मिक गंधासाठी. विवेक बुद्धिप्रामाण्य शिकविणाऱ्या शाश्वत मूल्यांसाठी, अन्याय अत्याचाराला पाठीशी घालणारांना तलवार बनणारी, दारिद्र्याने पिचलेल्यांची अस्मिता कवेत घेण्यासाठी, मोर्चा आंदोलनाने सुप्त हताश जनसमूह पेटवण्यासाठी आणि विशेष म्हणजे.

'आत्मविश्वासाचा
दिव्य संदेश दिला
त्या युगपुरुष डॉ. आंबेडकरांसाठी
समर्पित आहेत,'

ह्या समर्पण भावनेचा अंतःप्रवाह 'विस्फोट' च्या सामाजिक आशयांच्या कवितातून झुळझुळताना आढळतो.

ह्या संग्रहातील, मी एक मंत्री, छापकाटा, शांतीदूत, कडेलोट, अड्डा, कंट्री, बाबासाहेब या कविता उपरोध व समाजस्पर्शी आशयाने जशा भारलेल्या आहेत त्याचप्रमाणे यातील प्रेमकविताही लक्षात घेण्यासारख्या आहेत. 'अेक विराणी' ही कविता तर आगळचा ढंगाची प्रेमकविता आहे. दाहक वास्तवाला, विषम व्यवस्थेला प्रेमसंदेशांचे संजीवन कवीने शिंपडले आहे.

......तुझ्या हिरमुसल्या गालावर
गुलाब फुलव हास्यांचा
दरवळून टाक सुगंध
संधिकालाच्या फायात

तुझ्या ह्या तेजस्वी डोळ्यात
अंगार ओत धगधगता,
तुझ्या ह्या कोमल हातात
मशाल घे विद्रोहाची
अन् रुढी परंपरा
जुनाट उबट व्यवस्था
यांना तू उध्वस्त कर

ह्या कवीतेत पारंपारिक प्रतिमांचा स्फोटक पद्धतीने केलेला उपयोग नवा आहे. सहज आहे. त्यामुळे ह्या कवितेला गती प्राप्त झाली आहे. ही गती आहे कवीच्या मनातील आवेगाची, संवादाची, भोगलेल्या अनुभव दुःखांची व प्रतिकाराचा वसा घेणाऱ्या कार्यकर्त्याची.

श्री. सोनावणे यांच्या या संग्रहातील कविता गुणवत्तेच्या दृष्टीने संमिश्र आहेत. विचार लय प्राप्त होत असताना कधी कधी अधिक शब्द वापरण्याचा कविला मोह येतो. काही वेळेला कविता वेग धारण करीत असतानांच नको तितके, 'डॉक्युमेंटेशन' करायला लागते. कवीला स्वतःचा आकार अजून गवसायचा असला तरी त्यात जागरुकतेची चिन्हे आहेत. खूप हौसेने व प्रेमाने कवीने हा कवितेचा दिवा जोपासला आहे.

विरोधी चित्रांना एकापुढे एक मांडून कविता पेश करायची त्यांची खास लकब आहे. गणित, छापकाटा, मी एक मंत्री, या कविता यादृष्टिने पहाव्यात.

सहज शहरी माणसाच्या बोलण्यात येणारे इंग्रजी शब्द बिनदिक्कत वापरण्याची या कवीची विशेषता कॉल, थँक्स, परमनंट, सोशल, ॲक्टिव्हीटी, मेलडी, इत्यादी शब्दांतून जशी जाणवते, त्याचप्रमाणे बोली भाषेतील देशी वाणाचे व ग्रामीण ढंगांची शब्दकळाही 'विस्फोटा'त अनेक ठिकाणी आढळते. वावधान, इचकायला, सबुरी, टिऱ्या

घुगऱ्या, कणग्या, वेस, बेलभंडार, चुल्हा, नायहे, सबुरी, गुमान, वगैरे शब्द यासाठी वानगीदाखल सांगता येतील. काही जोडशब्दातील संकरही कविता प्रत्ययकारी करून जातो. शब्दफुले या कवितेतीलच हरेकाचे रुधिर, निढळच्या स्वेदात, पुरोगामी मोसम या सारख्या शब्दसंकराची गर्दीही करण्याचे वैशिष्टच दिसते.

कवितेचा समारोप करण्याची नाटचपूर्णताही ' विस्फोट ' मधील कवितांचे वैशिष्टच म्हणून नोंदता येईल.

जुनाट उबट व्यवस्था
यांना तू उध्वस्त कर बिनधास्त.
उध्वस्तकर बिनधास्त. (एक विराणी)

कोरेगांव लढाईत
कामी आलेल्या त्या तलवारी
परजून घे,
त्या तलवारी परजून घे (कविता तिच्याकरिता)

याची नोंद घ्या
याची नोंद घ्या. (आत्मवंचक)

बाबासाहेब, कन्ट्री, उगीचच, एक विराणी ह्या या संग्रहाची आठवण ताजी ठेवणाऱ्या यशस्वी कविता आहेत. बाबासाहेबांनी दिलेल्या संदेशाने परिवर्तनाची वाटचाल करणाऱ्या क्रांतीपुत्राच्या युद्धाची स्पंदने ' विस्फोट ' मध्ये जशी पकडली गेली आहेत. त्याचप्रमाणे बहुजन समाजाची व त्यांच्यातल्या खऱ्याखोटया कार्यकर्त्यांची अगतिकता, अज्ञान, व्यसनाधिनता, पैशाचा लोभ, दूरदृष्टीचा अभाव, एकमेकांचे पाय ओढत खच्चीकरण करण्याची विनाशक शर्यत त्या अवघ्याचेच हुंकार, श्री. मधुकर सोनावणे आपल्या स्वतःच्या संस्कारांना साक्ष ठेऊन चित्रित करतात. त्यामुळे त्यातल्या यशापयशाच्या आनंदाची लाट त्यांच्या शब्दाशब्दातून फुटताना पुटपुटताना दिसते.

श्री. सोनावणे ज्या संस्थासमाजाशी मनाने व जन्माने बांधील आहेत, त्या बांधिलकीची ही कविता आहे. स्वतः चळवळीत असणाऱ्या कवीची एक काव्यमय कैफियत म्हणजे विस्फोट. आपल्या पडझडीचा सरधोपट राजरस्ता आणि वाटापायवाटांचा क्रमवार आलेख म्हणजे विस्फोट. त्यामुळे शब्दबद्ध होऊनही ही कविता अस्फुट राहण्याचा तिचा स्वभाव आहे. खूप खूप बोलूनही व संपणाऱ्या भोगवटचांची ही कहाणी आहे. आपल्या मर्यादांची कवीला जाणीव आहे.

'ज्यांनी आपणास नाडले आहे
नि प्यायलेत रक्त जळवेप्रमाणे
त्यांचा बंदोबस्त मला करायचाय
अनेकविध विचाराने मी भांबावलोय' (मी एक मंत्री)

'आयुष्याचे नाणे
पैजेला लावण्याअगोदर
संसाराचा स्फोट अन्
नोकरीला घटस्फोट देण्याअगोदर
माझ्या आंतरिक शक्तिला फुलवतोय'(छापकाटा)

अशा आंतरिक शक्तीना स्फुलिंग शोधणाऱ्या या जागरुक डोळस कवीला मी कवितेच्या माळरानावरल्या त्याच्या प्रवासाला मनोमन शुभेच्छा देतो. त्यांची समर्पित शब्दफुले रसिकांच्या मनातही सुगंध फुलवतील. आता तर 'विस्फोट' झाला आहे, आला आहे. सगळेच काही काळ वाट पाहूया.

**– प्रा. केशव मेश्राम**

'फुलराणी'
साहित्य सहवास
बांद्रे (पू.) मुंबई ४०००५१

# तू

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५६
क्र. २५४१५
२२।१।६६
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

कळत नकळत
असं काय ढकल्लस
दुसऱ्या जगात ....
त्या दुनियेत आता पायपीट
तिथं तुझी तर क्रांतीची मशाल
थोडा उजेड दिल्याबद्दल थँक्स् !

□

# अड्डा

आमच्या अन्याय अत्याचाराचा
खदखदता असंतोष
पारंपारिक चुल्ह्यावर ठेवलाय
धर्मांधांच्या निखाऱ्याने आमच्या
भावनांचे, अब्रूचे करतायत
बाष्पीकरण राजरोस
त्याच्या अर्कावर
लावली जाते मलमपट्टी
थंडगार सबुरीच्या आश्वासनांची
अन् गाळला जातो सोमरस
भाषणबाजीच्या अड्ड्यावर
अनीतिच्या ग्लासातून

गळी उतरवीत
सोबत माया त्यागीच्या
टिच्यांवर शिजवल्या जातात घुगऱ्या
चविष्ट वृत्तपत्रातून
सवंग समाजास
बर्बाद करीत

□

# कडेलोट

तुमच्या स्मृतिग्रंथाच्या तिजोरीत
बंदिस्त केलेली संस्कृतिची संकल्पना
जगाच्या बाजारात आता
मोडीच्या भावात निघालीय

दगडाला शेंदूर लावून
स्वर्ग नरकाच्या भ्रामक वल्गना
पाप पुण्याच्या संदर्भात
परंपरेच्या मग्रूर नशेत
सर्वंहारा दुबळ्यांना
अस्पृश्यतेचा अभिषेक करून
सतत टाचेखाली
चिरडीत राहिली

मनूच्या गरळेतली
बुरसटलेली नीतिमुल्ये
त्यांच्या गळी बांधून
हेतूपुरस्सर
भरडीत राहिली

त्यांच्या दारात
आलाय सूर्य
विज्ञानाची किरणं घेवून
पुष्यमित्रशृंगाच्या
कुटील वारसदारांना
स्मृतिग्रंथ नि
पिढीजात परंपरांना
विज्ञानी किरणांच्या

तप्तरसात
कढविण्यास
सडविण्यास
आर्मस्ट्राँगने आणलेल्या
मातीच्या चुल्हयावर

उकळलेला
उसळलेला
बुद्धिप्रामाण्याचा अर्क
संजीवनी देईल
सर्वहारा दलितांना

तथागताची
जगद्वंद्य मूल्ये

समता, स्वातंत्र्य
नि बंधुता
जगभर चिरमंगल
रुजविण्यासाठी
सजविण्यासाठी

मनूच्या पिलावळींची
पूर्वापार मिरासदारी
बुरसटलेली नीतिमूल्ये
कडेलोट करून

□

# कन्ट्री

माणसं वितळतात इथं
देशात कन्ट्री कोसळावी तशी
परमिटच्या शिक्क्याने
ती परत उभारलीच जात नाहीत
डोकी साताजन्माचा भार असतो
पायाखालची जमीन नि-
डोक्यावरचे आभाळ आपले नसते
दिवसाभराचा शीण
आण्टीच्या पदरी जडला जातो
चिल्यापिल्यांचा घास काढून
हिंदोळत असतात आपल्याच गर्तेत
त्यांना माहित असूनहि

ते कुढत असतात, सडत असतात
आपल्याच करणीवर
उरल्या दिसाची, उरल्या खिशाची
गोळाबेरीज केली जाते
तेव्हा टळून गेलेली असते वेळ
गरगरत असतात घड्याळाचे काटे
कोसळणाऱ्या देहांना देहान्तापर्यंत
डोळ्यातील प्रकाशगर्भ धूळधान करीत
परमिट दिलेल्या देशाच्या कन्ट्रीत

□

# शब्दफुले

माझी शब्दफुले
त्यांच्यासाठी आहेत
ज्यांच्या घरात कधीच
सूर्य उगवला नव्हता
परंपरेने अन्
अंधश्रद्धेने
ठेवले होते त्यांना
अंधारात

चंद्रमौळीत
गावकुसाबाहेर
त्यांच्यासाठी
सर्मपित आहेत

माझी शब्दफुले
त्यांच्यासाठी आहेत
ज्या दीन दुबळ्या
गरिबांच्या आणि
श्रमिकांच्या दुःखास
आशेचा कंदील नि
आत्मविश्वासाचा
दिव्य संदेश दिला
त्या युगपुरुष डॉ. आंबेडकरासाठी
सर्मपित आहेत

माझी शब्दफुले
त्यांचेसाठी आहेत
ज्यानं साऱ्या जगास

‘दु:ख जेथून निर्माण होतं
त्याची कारणं शोधा व
ती समूळ नष्ट करा’ असा
जगद्वंद्य विचार दिला
त्या महामानव तथागतासाठी
सर्मपित आहेत

माझी शद्बफुले
दरवळत असतात
अनात्मिक गंधात
बहरतात
अनिश्वरीय नव्हाळीत
प्रज्ञा शील करूणेंत

माझ्या शब्दफुलांना
आशय दिलाय विज्ञानी
शाश्वत मूल्यांचा
विवेकी सिंचन केलय
बुद्धिप्रामाण्याच्या कसाच
प्रकाश किरणं आहेत
तत्वनिष्ठ विवेकाची
झुळझुळणारा पवन आहे
पुरोगामी मोसमातला

माझी शब्दफुले
बहरतात
श्रमिकांच्या निढळया स्वेदात
शूर वीरांच्या मनगटात

नि जल्लोशतात एकजूटीतून
झिंदाबादच्या बुलंद आवाजात

माझी शद्बफुले
होतात तलवार
अन्याय अत्त्याचाराला
पाठीशी घालणाऱ्याविरूद्ध
करणाऱ्या विरूद्ध

माझी शद्बफुले
हरेकांच्या रुधिरात
पेटवतात वेद प्रस्थापितांचे
अन भिडतात गुलाबी रज:कण

आसमंतात
दारिद्र्याने पिचलेल्यांची
अस्मिता कवेत घेवून

माझी शद्बफुले
उधळीत जातात प्रेरणा
मोर्चा आंदोलनातून
गर्जत पर्जंत
जोरसे बोल– हल्ला बोल
जातपातपे– हल्ला बोल
पुंजीवादीपे– हल्ला बोल
डरता है क्या– हल्ला बोल
बोल मेरे प्यारे– हल्ला बोल

□

# शांतीदूत

आजच्या ह्या गतिमान युगात
हैदोस घातलाय
रक्त पिपासू जळवांनी
पेरल्या जातात ठिणग्या
कणग्याभरून शस्त्रास्त्रांच्या
धर्म पंथाच्या कडव्या अविचारी
अतिरेकी मनात

त्या
निजवतात आपली नीति
‘मी नाय त्यातली नि
कडी घाला आतली’ म्हणत
अशा या मानव संहाराच्या
समंधाकडुन

धुमसवला जातोय
जातीयवाद
पंथवाद
राष्ट्रवाद
विनाशाच्या भीषण दरीत
युद्ध म्हणजे विध्वंसन
युद्धात असतात
विनाशाची बीजं
मानव संहार
अटळ होवून

अशा वेळी
तू ये

तथागताची
आयडेंटिटी घेवून
निनादू दे तुझा क्रांतीपर्व
दशदिशातून
तू वाढव आमचं आत्मबळ
नि पेरणी कर
समतेची
शांतीची
या दिगंती शिवारात
सारं शिवार फुललं
हरेक अंकुराच्या
आत्मतेजानं
नि घडेल परिवर्तन
माण्सा माण्सात

धर्माला सोडून
पंथाला मोडून
जातीला गाडून
विश्वबंधुत्वाचा
नारा गात

# छाप–काटा

भडव्या तुझी नोकरीच घालवतो
तो कडाडला विजेचा लोळ फेकीत
सर्वांगाची लाही लाही करून
माझ्या अगतिकतेच्या रेवड्या उधळीत

त्याला कसे सांगू ?
तुमच्याच कळपातील मी
अेक सरकारी नोकर
दुःख दारिद्र्याचा वाटेकरी
मलाहि वाटतं–
झोकून द्यावं हे आयुष्य

छाप–काटा खेळतो तसे
समाज बांधवांसाठी

पण
जेव्हा मी मागे वळून पहातो
गतकाळाच्या स्मृतीत ....
ढुंगणावर ठिगळ नी हातात काठी
फाटक्या टोपीत डोकं अन्
डोकीवर तुटकं टोपलं असलेला
हीन दीन माझा चेहरा
चतकोर शिळ्या तुकड्यापायी
'जोऽऽहार मायबाप
येस्कराला तुकडा वाढा' म्हणत

वणवण भटकणारा माझा देह
हे मी कसे विसरू ?

आई सर्‌वा सुरकुट नि मोलमजूरी करून
आम्हां भावंडाची एक एक येळ
निभवायची
कधी नुसतेच उकडलेले वाल
मीठ लावून तर–
कधी चाळलेले बटाटे
तिन्ही सांजासाठी

रातीला शिरायचो आईच्या कुशीत
आई अंगाखांद्यावरून हात फिरवायची

डोळ्याचं पाणी पुशीत
हे मी कसं विसरू ?

आयुष्याचे नाणे
पैजेला लावण्या अगोदर
संसाराचा स्फोट अन्
नोकरीला घटस्फोट देण्या अगोदर
माझ्या अंतरिक शक्तिला फुलवतोय
भविष्यकाळातील सुखांना नि-
गतकाळातील यातनांना साक्ष ठेवून
माझ्या श्रमिक बांधवांसाठी

□

# उगीचच



तुझ्या रुतलेल्या जखमांच्या जाळ्यात
मी कसा गुरफटला गेलो
समजलंच नाही
आठवणींची दारं उघडून
मी डोकावलं तुझ्या अंतर्मनात तेव्हा
त्याच्या चाफेकळ्यांना फुलवणारी तू
लपवित होतीस तुझ्या सादळ जखमा
अन्
हापीसातील फायलीत
उसनं शिर खुपसून
कोरीत होतीस एक नक्षत्र

प्राक्तनातल्या शीडावर
तेव्हा
तुझ्या हृदयातील सागरलाटा
धडकत होत्या सुन्या किनाऱ्यावर
मी मात्र किनाऱ्यावर बसून
उगीचच
वेचीत होतो लाटांची स्पंदनं

□

# बाबासाहेब



बाबासाहेब !
आमच्या पहाटच्या स्वप्नात
फुलतायत आशा आकांक्षा
किलबिलणाऱ्या पक्षांच्या
सुमधूर स्वरात
पुलकीत भाव
अंतर्मनात साठवित
तुमच्या समर्थ मूल्यांचा
दिपस्थंभाप्रमाणे आधार घेवून

आम्ही निघालोय
दारिद्र्य नि लाचारीला
मुठमाती देण्यासाठी
शेंदुरल्या पाषाणावर
प्रातः अभिषेक उरकून
अनिश्वर अनात्माच्या
दिंडीत टाळ पिटीत
कर्ममेळा कबिराचे
स्लोगन्स गात
हे क्रांतीवंता
तू समाजहेतूचं विद्वत्तेचं
डायनामिक चिंतन करून
मंथन केलेलं चवदार पाणी
त्याचं सायंटीफिकली रसायन करून

आम्ही मारून घेतलीयत
इन्जक्शनं
नवजात अर्भकास ट्रीपल देतात तशी
डॉ.
आमच्या ह्या मोडीत निघालेल्या आयुष्याची
सोडवणूक केलीस ‘ धम्म ’ देवून
समता, स्वातंत्र्य नी बंधुभावासाठी
अज्ञान अंधश्रद्धेच्या कर्दनकाळाचा
निःपात करण्यासाठी
हे आमच्या दिग्विजयी युगंधरा
तुझा कानमंत्र
‘ शिका संघटीत व्हा आणि लढा ’
हा–
आम्ही कोरलाय काळजावर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
आ. क्र.
संग्रह शाखा (स्थळ

तुझ्या अधुऱ्या स्वप्नांना
चिरंतन साकारण्यासाठी
आता सळसळणारं रक्त झालय मस्तवाल
फुत्कारतय शद्बबद्ध
कथा–कवितेतून
सभा सम्मेलनातून
मोर्चे आंदोलनातून
आपल्याच ताला सूरात
तू दाखविलेल्या प्रकाश वाटेने

□

# शहीद

तुम्हाला मी चांगलाच ओळखतोय
अज्ञानाच्या कोंडीत डांबून  ठेवणारे तुम्ही
तिरस्काराची लेबलं लावून हयातभर
हेटाळणी होणाऱ्या आम्हा शोषितांना
सापडलाय प्रकाश किरण
प्रगतीच्या दिशेने नेणारा

द्वेष मत्सर हीन दीन करून छळण्याची
स्रवतेय जखम अंत:करणात

त्याचा सूड घ्यायचाय आम्हाला
माणसासारखं जगण्यासाठी
आम्हां शोषित दलित गुलामांमध्ये
निर्माण केलेल्या जातीच्या भिंती उखडून
आम्ही सर्व पेटून उठलोय
वाघाला सामोरे जाण्यासाठी

आमच्या आंदोलनाच्या प्रत्येक संघर्षातून
मशाल होतेय ओकणारी फेकणारी
धगधगत्या ज्वालेसारखी
शब्दरूपाने, रक्ताळलेल्या भावना
दुखावलेली मने गल्फस्ट्रिम होतायत

उफाळलेल्या समुहातील
धुमसणाऱ्या मनात
सूडाचे डोंब उठतील आसमंतात
गर्जना करीत झिंदाबाद
गुलामगिरी विरूद्ध
दारिद्र्या विरूद्ध
बलात्कार, अन्याय अत्याचारा विरूद्ध
देहाची बाजी लावून
होवू शहीद
उद्याच्या उषःकालासाठी
□

# गणित

दोन भिन्न जातीच्या तरूण नरमादींची
बेरीज करून टाका, मादक रात्री
मग संकरीत मानव उदयास येईल
समतेची काया अन् ममतेची माया घेवून

बुरसटलेल्या संस्कृतीची संस्काराची
वजाबाकी करा
वर्ण वर्ग भेदाच्या भिंती तोडून
विश्वबंधुत्वाचे बी रुजविण्यासाठी

सहकाराचा गुणाकार करा
जाती-निरपेक्ष विवेकातून

मानवतेची चिरमंगल मूल्ये
फुलविण्यासाठी

•

दारिद्र्य यातनांचा भागाकार करा
अगतिक दुःखाच्या जाणिवेतून
मानवी जीवनाशय आकलण्यासाठी

□

# उल्का

दारिद्र्याच्या क्षितीजावर
तडफडणारा उल्का तारा
असमतेचा वादळवारा
अस्वस्थ करतो तुझा किनारा
बांध तोडून भळभळतोय
हरेक धमण्यांमधून
पेटलेल्या भावनांचा
विस्फोट करीत

□

# एक विराणी



तुझ्या व्यथांच्या जथ्याचं
गठुड भळभळणारं
तुझ्या रुढीबंद बेड्या
अेक संभ्रम अनादी
तुझ्या आक्रंदणाऱ्या मनाचा
कोंडमारा करणारी
येथली समाज व्यवस्था
तुझ्या अहेवाचं लेण विवर्ण
तुझा मनसुबा झालाय निष्पर्ण
तुझी अर्धी अधुरी जीवनस्वप्न
चुरगळणारा दयित
फुलणाऱ्या कळयांचा
भ्रांत विश्वामित्र
येथली नीतिमुल्यें

रुढीबंद जीवनधारा
या तुरुंगांना सुरुंग लावून
तू बाहेर ये
तू मुवत हो ! तू मुक्त हो ! !

व्यतीत व्यथित बर्बाद वर्षं
त्यात कधी मिळालाय हर्षं
तुझं हे भिजत घोंगडं
कां कुजवतेस ?
ये, तू तिमिराला चिरत ये
दाही दिशा न्याहाळ
तुझ्या ह्या फाटलेल्या गगनाला
तू सुई–दोरा शोध

गे सखे
तुझ्या ह्या नवतीच्या नूराचं
कोमेजलपण
विषण्ण वेदनालय
काळजाला करपवणारं
घाण्याच्या बैलाची ढापण माळून
वाळवंटात दिशाहीन फिरू नगस

तुझ्या ह्या हिरमुसल्या गालावर
गुलाब फुलव हास्यांचा
दरवळून टाक सुगंध
संधिकालाच्या फायात
तुझ्या ह्या तेजस्वी डोळ्यात

अंगार ओत धगधगता
तुझ्या ह्या कोमल हातात
मशाल घे विद्रोहाची
अन् रुढी–परंपरा
जुनाट उबट व्यवस्था
यांना तू उध्वस्त कर
बिनधास्त
उध्वस्त कर बिनधास्त

□

# संघटना

तू साकारली आहेस
माझी प्रेरणा होवून
तुझ्या बळावर मी
उतरलोय रणांगणात
सहकारी बांधवांचं
सुदर्शनचक्र हाती घेवून
माझ्या हृदयातील अंधारगुहा
करून टाक प्रकाशमय
अन् उज्वलतेच्या भविष्यकाळाचा
मार्ग होऊ दे मोकळा
संचार होऊ दे त्याचा
माझ्या मनात प्राणात रक्तात
गात्रागात्रात फुलु दे माझ्या
उद्याचा प्रसन्न उष:काल

तुझ्या स्फुर्तीने पेटतील मशाली
माण्सा माण्सातून नि–
लावतील धसास प्रश्न ते
जनसामान्यांचे वेशीवर टांगून
तुझ्या रुपात मी पाहृयलाय
अेक पराक्रमी घोडा
ओततील प्राण
माझे साथीदार
तुझे सारथी होवून
खेड्याखेड्यातून
शहरा शहरातून
सरकार दरबार पर्यंत
शर्यत जिकण्यासाठी
ध्येयाच वारं प्यालेले सारथी

असतील तुझ्या जोडीला
तमा बाळगणार नाहीत ते
दुश्मनांच्या कावेबाजीची
आडवे येणारांना करतील ते चित
त्यांच्या बुद्धी कौशल्याने
तेव्हा फुंकर माझ्यातला ध्येयवाद
प्रज्वलीत कर पुन्हा एकदा
धगधगत्या ज्वालेप्रमाणे
पुन्हा कधीहि न विझण्यासाठी
□

## गांधारी

लग्नाआधी म्हणे
सत्यवती झाली माता
व्यास पुत्र प्रसविता
मुनि पराशर पिता

सप्तपदी शंतनुशी
पोटी आला विचित्रवीर्य
आर्त दुखण्याने त्याच्या
वाया गेलें सारे कार्य

म्हणे सत्यवती व्यास पुत्रा
हाती घ्यावे कामसुत्रा

वंशवेल जतण्याला
माझ्या स्नुषा घे कुशीला

अंबा, अंबालिका संग
व्यास झाला मग दंग
धृतराष्ट्र जन्मा आला
तसा पंडू नि विदूर

याग व्यासाची ग बाई
लई ख्याती हाय न्यार
शुक्राचार्यासह
त्यास पोरं झाली चार

देवामंदी देव
म्हणे हाय ब्रह्मदेव
कन्या संग केला
असा देव अेकमेव

रामराज्याचे की गुरु
म्हणे व्हते वशिष्ठ मुनि
स्नुषा संग चाळे केले
असे ऋषी-मुनि गुणी

अशा किती सांगू कथा
आणि वर्णू मी आदर्श (?)

वेद पुराणा की मंदी
घेतलाय परामर्श

ऐसे कर्मजड वाचता
नेत्री येते की अंधारी
शत पटीन ग बरी
होती बिचारी गांधारी

□

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५६१
आनं दा. क्र. २५४९५
२२।७।८८
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# किरणं

नैराशाच्या काटेरी कुंपणात
रक्तबंबाळ झालीयत
आशाळभूत नजरेतील करूणा
बकाल वस्तीच्या कुडाच्या खुराडचात
तडफडणारी किरणं
भूकेच्या आर्त किकाळचात
दारिद्र्याच्या क्षितीजावर
विषमतेच्या वादळवाऱ्यातून
वावधान होवून येताहेत
पेटलेल्या भावनांचा
प्रलयंकीत आवेशाचा
विस्फोट करीत

□

## उध्वस्त



तुझ्या उजाड अंगणात
सहज पक्षी उतरले
तर त्यांना तू
चार दाणे टाकायचे होतेस
त्यांच्या नाचगाण्यांच्या मैफीली
तुझ्या अंगणात रंगल्या असत्या
एकलकोंडया वेलीला
बहर आला असता
दिलखुलास गान नि प्रसन्न शानचा
मनमुराद स्वाद घेतला असता
थोडा विरंगुळा मिळाला असता
माथ्यावरची दु:ख
खाली उतरली असती
मैफीलीतल्या श्रोत्यांत सामील होताना

अंतरीची सुखं जागी झाली असती
पहाटच्या मल्मली जुगलबंदीत
आठवणींची फुलं दरवळली असती
काही काळ बहरली असती
स्वागत केलं असतं
पौर्णिमेच्या चंद्रानं
तारका मंडळासह
पण–
पण तू ते अंगणच गिळून टाकलय
येथल्या नीतिमूल्याखातर
नि पक्षी सैरावैरा
तुझ्या अंगणाच्या शोधात
झपाटल्यागत

□

# हकीगत

दारूण घेट्टो मटका बेवडा
खैरात अनीतीची सारी
राजनीती कशी फरफटते या-
गैरात मत्त विखारी

अबलांची लुटते आबरू
नि झडे दरोडा धाडी
खादी ०० वादी सगळे इथले
बगळे साव गिधाडी

न्याय आंधळा पंच वेंधळा
तस्कर माथी टिळा
स्वातंत्र्याच्या उरी घातला
तत्त्वच्युतांनी शिळा

लाच वशिला रण भ्रष्टांचे हे
बेताल नेता नारा
जगी या अंदाधुंदीचा
पसारा वाढला सारा

□

# आठवणी

कविता लिहून लिहून
थकलेले डोळे
आठवणींचा हात धरुन
चालू लागतात गतकाळात

० ०

माझ्या टयुबचा फ्युज उडवून
तिने स्वतःचा चेहरा उजळवला
बेगडी शब्दांच्या प्रकाशात
हृदयाला तिमीरात बुडवून

० ०

तुझ्या आठवणींचे पक्षी
तिन्ही सांजेला डोळयापुढं येतात
नि रंगी बेरंगी प्रतिबिंब टाकून
भूरर्कन उडून जातात

० ०

लोकलने लोकांना लॉक केल्यानंतरहि
असतात लोक फलाटावर
'ती' निघून गेल्याच्या
आठवणींसारखी

सकाळच्या प्रसन्न वातावरणात
मी अेक कविता लिहिली नि-
कोंबडीच्या पिलांनी स्वरबद्ध केली
अेक अेक दाणा वेचत

अहर्निश वाचनात गुंतून पडावे
'त्या' आठवणी विसरण्यासाठी
तर त्या शब्दांच्या मागे लपून
वाकुल्या करतात दात विचकीत

□

# मी एक मंत्री

मी आता मंत्री झालोय
जनतेने वर्षाव केलेले पुष्पहार
मी स्विकारतोय आदराने
लवून स्मित करीत
टाकतोय दृष्टीक्षेप
दूरवरच्या चाहत्यांपर्यंत

मी निर्धार केलाय
साऱ्या समाजाच्या दुःखांना यातनांना
समूळ नष्ट करण्याचा
बेघरांना घर
बेकारांना नोकरी
भूमिहीनांना जमीन

नि पिढ्यान् पिढ्या दारिद्र्यात
खितपत पडलेल्या दलितांचा
भविष्यकाळ उजळविणार आहे

ज्यांनी आपणास नाडले आहे
नि प्यालेत रक्त जळवेप्रमाणे
त्यांचा बंदोबस्त मला करायचाय
अनेकविध विचाराने मी भांबावलोय

: २ :

हिनं हाकारल उठवलं
मी स्वप्नातून जागा होत आहे

' साखर संपलीय रॉकेल संपलय '
हिची तक्रार–
पोरांना तुकडा करून घालायचाय
नाहीतर ती उपाशीपोटी शाळेत जातील
मी म्हटलं–
' किराणावाल्याकडून उधार आण '
ही–
किराणावाल्यानं बंद केलीय उधारी
मागचे देणे दिले नाय–
म्हणून आलेय माघारी

दुधवाला दारात थकलेलं बिल घेवून
मग त्या विचारात मन घेतलं ओवून

दुध जर बंद झाले बाळाचे
कुठवर साहयाचे हे दिन काळाचे

कोणाकडे दात इचकायला जागा नायहे
सगळेजण सावकार अवती भवती
घरमालक
किराणावाला
दुधवाला
डॉक्टर
यांनी धरणे धरले आहे
हे सर्व सतत वर्षन् वर्ष चालल‌ं आहे

: ३ :

मंत्री व्हायचे असेल तर
संप, आंदोलने, धरणे ही असणारच
मी समजावून सांगत होतो माझ्या
स्वप्नील सुखावलेल्या देहाला
मोताद केलंय वास्तवात चहाला
□

# वात्रटिका

अेक होता बॉस
त्यानं केली करणी
सी. आर. चा रिपोर्ट लिहून
नोकरांना लावले झुरणी

अेक होती दगडाबया
बॉसची तिच्यावर माया
बॉसच्या साठी तिने
झिजवली काया

अेक होता हेडक्लार्क
बिलवाल्यांना करतो मार्क

परसेंटेजवाले पार्क
बाकीच्यांचा रस्ता डार्क

अेक होता भांडारपाल
याची सप्लायरशी गहरी चाल
बिलात करतो घोलमाल
म्हणून याचे वरती आलेत गाल

अेक होता आवेक्षक
ठेकेदाराशी याचं खातं
मस्टर अव्वाच्या सव्वा केला तरी
याचं साहेबाबरोबर नातं

अेक होता क्लार्क
पिण्याखाण्याचा हावरा

जर त्याला कधी चुकवले
तर व्हायचा कावरा बावरा

अेक होता शिपाई
काम चुकार परमनंट काशी
दम दिला तरी म्हणायचा
माझं वाकडं करित नाय येस्सी

अेक होता आरेखक
त्याला होता लिहायचा नाद
हापीसातील व्यंग छेडून
तो त्याना करायचा बाद

# वादळ लाटा

या डवरल्या वृक्षावर
कोणी केलीयत कलमं
की मीच करु इच्छीतेय
अेक कलम

अंतर्मनातल्या
सळाळत्या भावनांची
सरमिसळ
की, आदीम नृत्य
होवू पहातय

या रखरखीत वाटेवर
काटेच काटे

कपाळ करंटे
वर्दळीशिवायचं
सुन्नाटपण

अेक आस उदास
आतल्या आत
खदखदतेय
प्रत्येक वळणावर समंध की
मीच झालेय पिश्चाचर साळसुद

अेक तुफान वादळ
खळाळतय सर्वांगातून
लोचनांच्या समिंदरात

अप्रुप कोरीव लेणं
सतत डवरतय

अन् असह्य वेदना
ठसठसतायत
नसानसातून
वादळ लाटा होऊन
□

## आरेखक

आम्ही लाईन मारतो
वसुंधरेच्या अंतरंगावर
निष्ठेचा बोपेन मनात धरुन
फिरवितो त्याचा स्पर्श पारदर्शक कागदावर
अभियंत्याच्या कल्पनेची शाई भरून
पुढील पिढीच्या आशा आकांक्षांना
प्रत्यक्षात उतरविण्यासाठी
प्रिझमॅटिक कंपास दाखविल दिशा
फुलणाऱ्या मनासाठी
डुलणाऱ्या राणासाठी
डम्पी लेवलच्या दुर्बिणीतून
डुलणारं रान
फुटपट्टीत गोठवता येतं
सेट् स्क्वेअरच्या सहाय्याने

फुला–फळांसाठी
फुलणारं मन
फुटपट्टीतलं रानं विरघळविते
श्रमसाफल्याच्या
परमावधीसाठी

□

# कविता : तिच्याकरिता

तू त्या झपाटलेल्या
वेडचाला झाडलस
देवलशासारखं
थोडं समजावून
थोडं उमजावून
मेसायच्या साक्षीने
व्यवस्थेच्याविरुद्ध जातो म्हणून
तो मात्र शद्बांच्या छबिन्यात
पुढंच चाललाय
नीतिमूल्यांचं बॅलन्सशीट
ऑडिट करायला
तो नाकारतोय
माण्साचं माणूसपण हरवणारी मूल्ये
माण्साला कुजवणारे रिवाज

सोन्याने मढवलेले निस्तेज मुखवटे
गाभाऱ्यातले
तो हाकारतोय
माणसाचं माणूसपण जपणारं
जतणारं खरंखुरं बंडखोर काळीज
तो उलथू इच्छितोय इथली दांभिक व्यवस्था
तेव्हा तू–
इन्टलेक्च्युअलच्या
निसण्यावर
कोरेगाव लढाईत
कामी आलेल्या त्या तलवारी
परजून घे पुन्हा एकदा
त्या तलवारी
परजून घे पुन्हा एकदा
□

# आत्मवंचक

सोशिअल ॲक्टिव्हीटीजच्या नांवाखाली
रजिष्टर केलं एक मंडळ नि–
सुरू केल्या ॲक्टिव्हीटीज्
सामाजिक गरजांना बगल देवून

नायब्याचा सायब्या व्हावा म्हणून
बोलक्या बाहुल्यांना सोमरस देवून
ते सगळे कसे झालेत डोंबकावळे

मंडळाला घडविण्यात आमचेहि हात राबले होते
उन्हातान्हाची फिकीर न करता उपाशीपोटी

अन् ते मात्र–
अचुक निमित्त काढून गेलेत गांवी
अथवा दांडी मारली अन्य सबबीने
आम्ही त्यांना सोय करून दिली
दिलगीरी पोटी

अन् गाळलेल्या स्वेदाला यश आलं
त्यांच्याकड विश्वासानं सुपूर्द केलं मंडळ
सामाजिक कार्याची फळंफुलं बहरण्यासाठी
पण–
पण कुंपणानेच शेत खाल्लं बिनबोभाट
मंडळाचं वाटूळ केलं
सेवेचा मेवा केला नि–
संघाचा भंग केला

मराठी ग्रंथ संग्रहालय
२५६८
दा. क्र. २५४५५
१२।१।९८
ग्रं. शाखा (स्थल

नाचवलं त्यांनी संघाला मुरळीसारखं
स्वत: वाघ्या होऊन
उधळला गेला बेलभंडार
डिस्कोच्या ढंगात
व्हत्याची नव्हती केली
दिली गेली मुठमाती, अेकदाची त्याला
अन् त्या मातीनं सारवली त्यांनी स्वत:ची घरं
झगमगाट दिसावा तशी

ज्या मातीत आमचा निढळाचा घाम आहे
त्या मातीनं त्यांनी कोरलीहेत पदं
संघाच्या मुडद्याला साक्ष ठेवून

अशी ही बांडगुळांची औलाद
आजही मिरवते फॉकलंडमधल्या
रंगाढंगात नाक वर करून

कठपुतळीतले भाळतात तिच्या वरकरणी
रूपड्यावर
गरजला निजते शेजारी म्हणून
पण–
तिच्या झालेल्या संगतीचा आता
त्या सर्वांनाच झालीय बिमारी

उद्धार करतेय ती तिच्या त्याचा
सहकाराचा अन् सहवासाचा

छप्पन टिकलीच्या ह्या भवान्या
शाहजोगपणाच्या गप्पा मारतात
तेंव्हा–
आम्ही त्यांना तांदळातल्या खड्याप्रमाणे
बाहेर टाकतो सार्वजनिक कार्यातून
तरी–
त्या पिंगळासारख्या घण्‌घणतातच अवदसा
गल्ली बोळातूत करतात आमच्यावर
चिखलफेक

त्यांनी अेक लक्षात ठेवावं
दुसऱ्याच्या घरावर खडे फेकण्या अगोदर
आपलं काचेचं घर त्यांनी प्रथम नीट जपावं
नाहीपेक्षा–

भुंकणाऱ्यांकरिता
म्युनिसिपालटीच्या गाडीला कॉल करणं–
भाग पडेल
याची नोंद घ्या
याची नोंद घ्या.
□

# नकळत

असाच एकदा पेंगत पडता
साद घालून याद गेली
स्मृतिशिल्पांचे संदर्भ हुडकत

एक याद . . .
सहेलीला साक्ष ठेवून
तिनं प्यास व्यक्त केली
अन् आगंतुक विचारलं
पाणी प्यायचंय कां ?
मी हो म्हटलं नी—
चालत गेलो तिच्यासवे:
दूर दूर
संकेत स्थळी
वॉटरकुलर
अतृप्तीचं पांग फेडायला

तिनं सहास्य खूण केली
नजरेतल्या नजाकतीतून
यथाकाल
अधीर अधरास
नीर–मला तीर–दिला
तृप्ती अतृप्तीचा खेळ
यथोचित

तिचं अधर अलगत
टिपत होतं
माझ्या प्रीत खूणा
वॉटरकुलरच्या तोटीवर
तिलाहि नकळत
□

# जाती

जात्यांधाकडून
जाती भरडल्या जातात
त्यांच्या धर्माच्या जात्यावर
जात दाखवत
ती ' जाती ' झालीयत
राईटऑफ
विज्ञानी जात्यावर

□

## लागण

निवांत समयी झाली लागण
माशूक मारू डसली नागन
साद घालूनी मंतर शोधा
ठिकऱ्या करूनी उतरा बाधा
प्रियेस माझ्या निरोप द्या हो
तिच्याच साठी करतो टाहो
गिरक्या मारून घेई चकरा
तलफ मनाची देई टकरा

□

# हात



निळ्या नभाच्या प्रांगणात
आम्ही पसरलोय, तेवढेच–
खोप्टा खोप्टातून
आमच्या अनंत यातनांसह
विद्रोहाचे सुरूंग पेरीत
इथल्या व्यवस्थेविरूद्ध
चांदीचे चमचे तोंडात घेवून
जन्मणारे इथले कुलंगडे भाग्यवंत
कारखानदार जमिनदार पुंजीवादी
नि त्यांच्या मर्सिडिज इंपाला मारुती
उत्तुंग वातानुकुल बिल्डिग बंगले
पंचतारांकितमधील लंच टंच
नाजुक साजुक सर्वसुख
त्यांच्या पायाशी घेताहेत
लोटांगण नि

आम्ही पहातोय
आमच्या सुखांचे उल्कापात
इच्छांच्या गर्भात
गाभाडणारी सुखस्वप्न
नि सलत जाणाऱ्या
अगणित असह्य वेदना
आणि त्यांचे
आमच्या रक्त–घामावर
पुष्ट झालेले मतलबी हात
सरसावलेत आमच्या
वेदनेला गोंजारण्याकरिता
हरेक पंचवार्षिक
निवडणूकीत
□

# मानभावी

निळे गगन निळी धरा पवनहि आहे बरा
माझी नजर पित आहे तुझ्या नजरेतील झरा
निरूपम एक तारा आकाशात आहे अजून
माझ्या नजरेतील ज्वाला भडकत जाती अजून
निदिध्यास तू सखे वसतसे मम हृदयी
माधुरी अविट गे तव वदनातील प्रत्ययी
निरगाठ तव मनाची नजरेतून साकळली
मानभावी खरेच कां तूज शब्दातून आकळली

□

## गाणं ऐक्याचं

या जुन्या रुढींना
मोडा अथवा तोडा
या सर्व मिळूनी
गाऊ एकीचं गाणं
या सर्व मिळूनी
पाहू समतेची शान
या सर्व मिळूनी
फुलवू भारत सारा
हा श्रमिकांचा नि
दलितांचा हे नारा
या घाम गाळूनी
डुलवू तिरंगा प्यारा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५६८
दा. क्र. २५४१५


ही आस मज मनी
स्फुरते सांज सकाळी
जगी मानवतेच्या
तेजाळतील मशाली

□

# अस्तित्व

माझ्या अस्तित्वाची
होळी करुन तू
झोळी भरलीस
प्रतिष्ठेची
त्या राखेतील
फिनिक्स पाखरं
झालीत आभाळभर
रुंजतेय त्यांची
सुरेल मेलडी
तुझ्या नेत्रात
गात्रात नि
प्रतिष्ठा झालीय
कवडीमोल
तुझ्या अस्तित्वात
□

REFBK-0025495
REFBK-0025495



# स्वगत आणि स्वागत

इथल्या प्रस्थापित व्यवस्थेने ज्यांना जन्मतःच आणि पिढ्यानुपिढ्या शास्त्र आणि शस्त्र नाकारलंय/त्यांनीच आता या जुनाट व्यवस्थेच्या विरोधात एक नवी व्यवस्था जन्माला घालायचं ठरवलंय/त्यांनीच आता एक नवं शास्त्र जन्माला घालायचं ठरविलंय की जे अपौरूषेय नसेल/अपरिवर्तनीय नसेल/अनाकलनीय आणि अतर्क्य नसेल/आणि ज्यात आपलाच चेहरा आपणाला दिसेल/आणि ज्यातून आमचं आजचं नवं साहित्यविश्व आणि त्याचं अद्ययावत् साहित्यशास्त्र घडेल की जे उसनं नसेल/... तर अंगभूत आणि स्वाभाविक असेल/त्यातूनच आमची नवी कविता घडेल की जी नुसतीच नार्सिसससारखी सुंदर आणि फुलासारखी कोमल नसेल/तर विजेसारखी तल्लख आणि शस्त्रासारखी धारदार असेल/नव्हे, ज्यांना पिढ्यान्‌पिढ्या शस्त्र नाकारले गेले आहे असे आम्ही लोक तिचा शस्त्रासारखाच दुधारी वापर करू/अशी आजन्म प्रतिज्ञा घेऊन या सैन्यदलात दाखल झालेला आणखी एक रंगरूट म्हणजे आमचे कविमित्र मधुकर सोनावणे/त्यांनी आपल्या सोबत आणलेल्या 'विस्फोट' - स्फोटकाने आमच्या कवितेच्या कोठारात एका अस्त्राची नवी भर पडली आहे/त्यांच्या या पहिल्यावहिल्या कवितासंग्रहाला माझ्या शुभेच्छा! त्यांच्या कवितेचे इथून पुढचे अंतरंग लाव्हारसाने संपृक्त होवो एवढीच इच्छा!!

— राजा ढाले

मुंबई ४०० ०८३.

१ सप्टेंबर १९८७